
**माहे जूलै २०२४ महाचा मासिक अहवाल**

**मासिक अहवालामध्ये खालील घटकांनी चांगली कामगिरी केलेली आहे.**

| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| १ | सातारा | रिओ (डॉबरमन) | पोलीस हवालदार/११ जी.डी. मोरे | मल्हारपेठ पो. स्टे. गु. र. नं. १०१ / २०२४ बी. एन. एस. कलम ३३१ (४), ३०५ (अ) हा गुन्हा दाखल असुन घटनास्थळी श्वान रिओ यास संशयीत आरोपीने हाताळलेल्या गुलाबी रंगाची बदामाची नक्षी असलेली लहान पर्स चा वास दिला असता, श्वान रिओ घटनास्थळापासुन बाहेरच्या खोली मध्ये येवुन घराचे मुख्य दरवाजापासुन परत वळून किचनमध्ये जावून किचन मध्ये उभी असलेली साडी परीधान केलेली महिलेचे अंगावर उडी मारून व भुंकून इशारा दिल्याने सदर महिलेचे नाव विचारले असता तिने तिचे नाव सुवर्णा धोंडीराम पवार असे सांगीतले. सदर महिला ही फिर्यादी श्री. धोंडीराम गणपती पवार यांचीच पत्नी असल्याचे निष्पन्न झाले आहे. व तीनेच चोरी केलेली कबुली दिली आहे.<br>अशा प्रकारे गुन्हा उघडकीस आणणेकामी श्वान रिओ व त्याचे हस्तकांनी उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| २. | सोलापुर ग्रामीण | डॉली (डॉबरमन) | पो. कॉ. /१०८५ उमेश बाळासाहेब कांबळे | करमाळा पो.स्टे. सोलापुर गु.र.नं. ४६१/ २०२४ बी.एन.एस. कलम १०३, ३३३, ३ (५) हा गुन्हा दाखल असून सदर गुन्हयाचे तपासाकरीता घटनास्थळावरून सुमारे ३०० मीटर अंतरावर सापडलेल्या शस्त्राचा (लोखंडी सत्तुर) वास घेवुन श्वान डॉली ने मागोवा घेतला व सुमारे १ कि.मी. अंतरावर संशयिताच्या घराच्या दारासमोर थांबुन भुंकल्याने घरातील संशयितास तपास अधिकाऱ्याने ताब्यात घेवुन तपास केला असता संशयित आरोपिने गुन्हयाची कबुली दिली.<br>अशाप्रकारे सदर गुन्हयातील तपासात आरोपीचा शोध घेणेकामी श्वान पथकातील श्वान डॉली व श्वान हस्तक यांनी महत्वाची उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. |



| अ. क्र. | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ३. | पिंपरी-चिंचवड, पुणे शहर | रुद्र (डॉबरमन) | १) पोना/७४८६ नितीन पांडुरंग जगताप<br><br>२) पो.शि./२४६२ रामदास बाबासाहेब आव्हाड | शिरगाव - परंदवाडी पोलीस स्टेशन पिंपरी - चिंचवड, पुणे शहर गु. र. नं. ३५/२०२४ बी. एन. एस. कलम १०९ (१), (३), (५) प्रमाणे गुन्हा दाखल असुन घटनास्थळी जप्त करण्यात आलेल्या संशयीत इसमाचे कपडे हे दाखल गुन्हयातील अटक आरोपी पैकी कोणाचे आहेत यासाठी दाखल गुन्हयातील ०२ आरोपी व इतर ०५ इसम असे एकुण ०७ इसमांना उभे करुन घटनास्थळावरुन जप्त करण्यात आलेल्या संशयीत इसमाच्या कपडयाचा वास श्वान रूद्र यास दिला असता श्वान रूद्र याने सदर इसमापैकी १) पवन मोरे २) अक्षद जगताप यांना ओळखुन त्यांचेजवळ बसून व भुंकून इशार दिला.<br>अशाप्रकारे सदर गुन्हयातील तपासात श्वान रुद्र व त्याचे हस्तकांनी उत्कृष्ट कामगिरी बजावली आहे. |



अशा प्रकारे माहे **जूलै २०२४** मध्ये श्वान पथकामार्फत घरफोडी - ०१ खून - ०१, खूनाचा प्रयत्न - ०१, असे एकूण - ०३ गुन्हे उघडकीस आलेले आहेत.